# शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल.

## “महापरिनिर्वाण दिन”




**दिनांक : ६ डिसेंबर २०२५**

**स्थळ : शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल.**

शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल येथे दिनांक 6 डिसेंबर 2025 रोजी **डॉ. बाबासाहेब आंबेडकर** यांचा **"महापरिनिर्वाण दिन"** कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाच्या ज्येष्ठ प्राध्यापिका **मा. प्रा. बिजली दडपे मॅडम** यांनी केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या **मा. प्राचार्य डॉ. रमा भोसले मॅडम** होत्या. सर्व प्राध्यापक वृंद तसेच प्रथम वर्ष छात्राध्यापकांच्या उपस्थितीने हा कार्यक्रम यशस्वीरित्या संपन्न झाला.

कार्यक्रमाची सुरुवात त्रिओंकारांनी झाली. त्यानंतर मंगलमय सुरुवात करण्यासाठी महाविद्यालयाच्या **मा. प्राचार्य डॉ. रमा भोसले मॅडम** आणि सर्व प्राध्यापक वृंदांच्या हस्ते दीप प्रज्वलन, सरस्वती पूजन, आणि प्रतिमा पूजन संपन्न करण्यात आले. त्यानंतर सर्व मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

स्वागत झाल्यानंतर प्रथम वर्ष छात्राध्यापक **श्री. यश पाटील** यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक सादर केले. त्यानंतर प्रथम वर्ष **श्री. नितीन कवाड** यांनी प्रभावी असे भाषण सादर केले. गीत प्रथम वर्ष छात्राध्यापक **श्री. जयेश नडगे** यांनी सादर केले. तसेच प्रथम वर्ष छात्राध्यापक **श्रीमती. स्वाती म्हैसमाळे** यांनी एक सुंदर अशी कविता सादर केली.

त्यानंतर मार्गदर्शक मनोगत हे महाविद्यालयाच्या ज्येष्ठ प्राध्यापिका आणि कार्यक्रमाच्या आयोजिका **मा. प्रा. बिजली दडपे मॅडम** यांनी सादर केले. ह्यात त्यांनी अतिशय

उत्कृष्ट पणे पटवून दिले की मानवी मूल्यांची जोपासना करायला हवी तसेच बाबासाहेब आंबेडकरांचे विविधांगी बहुआयामी व्यक्तिमत्व याबद्दलची माहिती दिली.

कार्यक्रमाचे अध्यक्षीय मनोगत अध्यक्ष स्थानी असलेल्या महाविद्यालयाच्या **मा. प्राचार्य डॉ. रमा भोसले मॅडम** यांनी सादर केले. यात त्यांनी आजच्या युगाची प्रासंगिकता सांगितली तसेच संविधान फक्त म्हणण्याची गोष्ट नाही तर त्यातील स्वातंत्र्य समता बंधुता ही जोपासण्याची गोष्ट आहे हे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे सुयोग्य आणि प्रभावी असे सूत्रसंचालन प्रथम वर्ष छात्राध्यापक **श्रीमती शिवानी डोईफोडे** यांनी केले. तसेच आभार प्रकटीकरण **श्रीमती प्रणिता कदम** यांनी केले.

ह्या संपूर्ण कार्यक्रमात प्रथम वर्ष व द्वितीय वर्ष छात्राध्यापकांची अमूल्य अशी उपस्थिती होती तसेच सहकार्य देखील होते.












महाविद्यालयाच्या प्राचार्या मा. डॉ. रमा भोसले मॅडम सरस्वती पूजन, दीपप्रज्वलन, प्रतिमा पूजन करताना.

महाविद्यालयाच्या ज्येष्ठ प्राध्यापिका आणि कार्यक्रमाच्या आयोजिका मा. प्रा. बिजली दडपे मॅडम सरस्वती पूजन आणि दीपप्रज्वलन, प्रतिमा पूजन करताना.








प्रथम वर्ष छात्राध्यापिका श्रीमती अस्मिता बदे ह्या कार्यक्रमाच्या आयोजिका आणि महाविद्यालयाच्या ज्येष्ठ प्राध्यापिका मा. बिजली दडपे मॅडम यांना पुष्पगुच्छ देताना.

प्रथम वर्ष छात्राध्यापक श्री. यश पाटील महाविद्यालयाच्या मा. प्रा. डॉ. नीलिमा मोरे मॅडम यांना पुष्पगुच्छ देऊन स्वागत करताना.







प्रथम वर्ष छात्राध्यापक श्री. यश पाटील कार्यक्रमाचे प्रास्ताविक सादर करताना.

प्रथम वर्ष छात्राध्यापक श्री. नितीन कवाड बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवनावर भाषण करताना.







प्रथम वर्ष छात्राध्यापिका श्रीमती स्वाती म्हैसमाळे कविता सादर करताना.

प्रथम वर्ष छात्राध्यापक श्री. जयेश नडगे हे गीत सादर करताना.







कार्यक्रमाच्या आयोजिका तसेच महाविद्यालयाच्या ज्येष्ठ प्राध्यापिका मा. प्रा. बिजली दडपे मॅडम मनोगत सादर करताना.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असलेल्या तसेच महाविद्यालयाच्या प्राचार्या मा. डॉ. रमा भोसले मॅडम अध्यक्षीय मनोगत सादर करताना.







प्रथम वर्ष छात्राध्यापिका श्रीमती प्रणिता कदम कार्यक्रमाचे सुबक आभार प्रकटीकरण करताना.


सुबक आणि सुंदर रित्या प्रथम वर्ष छात्राध्यापिका श्रीमती शिवानी डोईफोडे कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करताना.







प्रथम आणि द्वितीय वर्ष बी. एड् छात्राध्यापकांची उपस्थिती.




प्रथम वर्ष बी. एड् छात्राध्यापक श्री. नितीन कवाड यांनी महापरिनिर्वाणदिनी केलेले फलक लेखन.